## खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

## राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

# प्रसिद्धी विभाग

# शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

### स्व. साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतीदिन कार्यक्रम



प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

**पुढारी**

www.pudhari.com

# विज्ञान प्रदर्शनामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन समृद्ध होतो

## ॲड. राजमाला बुट्टेपाटील यांचे प्रतिपादन; साहेबराव बुट्टे पाटील स्मृतिदिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन

**खेड : पुढारी वृत्तसेवा**

पुरोगामी महाराष्ट्र आणि आधुनिक भारत घडविण्यासाठी विज्ञानाधिष्ठित तरुणाई घडविणे आवश्यक आहे. विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन समृद्ध होतो, असे प्रतिपादन राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील यांनी केले. दरम्यान, विद्यार्थ्यांशी संपर्क साधून प्रयोगांमागील भूमिका त्यांनी जाणून घेतली.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आमदार दिवंगत साहेबराव बुट्टे पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात शुक्रवारी (दि. ३) आयोजित विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन ॲड. बुट्टेपाटील यांच्या हस्ते झाले, त्या वेळी त्या बोलत होत्या. या प्रदर्शनात दोन हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला तसेच एकूण ११६ विज्ञान प्रयोग प्रदर्शनात मांडण्यात आले. स्मृतिदिनानिमित्त क्रीडाज्योत, एनसीसी पथकाकडून मानवंदना, सर्वधर्मीय प्रार्थना, पुस्तक प्रदर्शन, सरस्वतीपुत्र या भीत्तिपत्रकाचे अनावरण, हस्ताक्षर स्पर्धा आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या प्रसंगी आमदार बाबाजी काळे, ज्येष्ठ विधिज्ञ सर्जेराव पानसरे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, डॉ. प्रकाश चौधरी, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. सर्जेराव पानसरे यांनी साहेबराव बुट्टे पाटील यांच्या जीवन कर्तृत्वाची माहिती दिली.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करताना ॲड. राजमाला बुट्टेपाटील.

**शिबिरात ७८ दात्यांचे रक्तदान**

या वेळी काजल वाळुंज, दिव्या पिंगळे या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. प्रा. नंदकुमार गायकवाड यांनी विज्ञान प्रदर्शनाचे नियोजन केले. राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने आयोजित शिबिरात ७८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. पुण्याच्या ससून रक्तपेढीचे समाजसेवा अधीक्षक अरुण बर्डे, रक्तसंक्रमण अधिकारी डॉ. सुरेश सावंत, ममता राठोड सहभागी झाले. सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळुक यांनी केले.

My Gramin Edition
Jan 04, 2025 Page No. 06
Powered by: erelego.com

केसरी

# बुट्टेपाटील यांचे जीवन समाजासाठी समर्पित : ॲड. पानसरे

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** साहेबराव बुट्टेपाटील आमदार असताना त्यांनी शेतकऱ्यांसाठी चासकमान धरण आणि विद्यार्थ्यांसाठी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या रूपाने शाश्वत विकासाचा पाया भक्कम केला. त्यांचे संपूर्ण जीवन समाजासाठी समर्पित होते, अशी भावना ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सर्जेराव पानसरे यांनी व्यक्त केली.



साहेबराव बुट्टेपाटील यांच्या २४ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी आमदार बाबाजी काळे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, राष्ट्रवादीच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, डॉ. प्रकाश चौधरी, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

ॲड. पानसरे यांनी बोलताना साहेबराव बुट्टेपाटील यांच्या जीवन कर्तृत्वाला उजाळा दिला. त्यांचे व्यक्तिमत्त्व स्वच्छ, प्रामाणिक, चारित्र्यसंपन्न होते. त्यांना वक्तृत्वाची देणगी लाभलेली होती, त्यामुळे समाज त्यांच्याशी जोडला गेला होता असे ते म्हणाले. चासकमान धरणाच्या भूमिपूजनप्रसंगी धरणग्रस्तांची बाजू मांडताना त्यांनी खणाला खण आणि फणाला फण मिळाला पाहिजे अशी आग्रहाची भूमिका मांडली. त्यांनी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या रूपाने ज्ञानमंदिर उभे केले, त्याचा लाभ तालुक्यातील डोंगरी आदिवासी भागातील हजारो विद्यार्थ्यांना झाला. साहेबराव बुट्टेपाटील यांनी शेती आणि शिक्षणासाठी जे केले त्यातून ते कायम आपल्याबरोबर राहतील असा विश्वास ॲड. पानसरे यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी काजल वाळुंज, दिव्या पिंगळे या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले.

लोकमत



साहेबराव बुट्टेपाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

# साहेबराव बुट्टेपाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष, माजी आमदार साहेबराव बुट्टे-पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन राष्ट्रवादी पक्षाच्या प्रदेश महिला उपाध्यक्ष ॲड. राजमाला बुट्टेपाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. पुरोगामी महाराष्ट्र आणि आधुनिक भारत घडविण्यासाठी विज्ञानाधिष्ठित तरुणाई घडवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. विद्यार्थ्यांशी संपर्क साधून त्यांनी प्रयोगांमागील भूमिका जाणून घेतली. विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन समृद्ध होतो असे त्या म्हणाल्या. या विज्ञान प्रदर्शनात ११६ प्रयोग मांडण्यात आले. या प्रदर्शनाचा दोन हजार विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

स्मृतिदिन कार्यक्रमाच्या निमित्ताने क्रीडाज्योत, एनसीसी पथकाकडून मानवंदना, सर्वधर्मीय प्रार्थना, पुस्तक प्रदर्शन, सरस्वतीपुत्र या भित्तिपत्रकाचे अनावरण, हस्ताक्षर स्पर्धा, आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी आमदार बाबाजी काळे, ज्येष्ठ विधिज्ञ सर्जेराव पानसरे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, डॉ. प्रकाश चौधरी, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

सर्जेराव पानसरे यांनी साहेबराव बुट्टेपाटील यांच्या जीवनकर्तृत्वाची माहिती दिली. काजल वाळुंज, दिव्या पिंगळे या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. प्रा. नंदकुमार गायकवाड यांनी विज्ञान प्रदर्शनाचे नियोजन केले. राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्रसेना यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात ७८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. पुण्याच्या ससून रक्तपेढीचे समाजसेवा अधीक्षक अरुण बर्डे, रक्तसंक्रमण अधिकारी डॉ. सुरेश सावंत, ममता राठोड सहभागी झाले. प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी सूत्रसंचालन केले.

Hello Pune Gramin
Page No. 3 Jan 04, 2025
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# साहेबराव बुट्टे पाटील यांचे जीवन समाजासाठी समर्पित : ॲड. सर्जेराव पानसरे

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

साहेबराव बुट्टे पाटील आमदार असताना त्यांनी शेतकऱ्यांसाठी चासकमान धरण आणि विद्यार्थ्यांसाठी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या रूपाने शाश्वत विकासाचा पाया भक्कम केला. त्यांचे संपूर्ण जीवन समाजासाठी समर्पित होते, अशी भावना ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सर्जेराव पानसरे यांनी व्यक्त केली.




साहेबराव बुट्टे पाटील यांच्या २४ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी आमदार बाबाजी काळे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, राष्ट्रवादीच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, डॉ. प्रकाश चौधरी, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ.एच.एम.जरे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

याप्रसंगी काजल वाळुंज, दिव्या पिंगळे या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. स्मृतिदिनानिमित्त क्रीडाज्योत, एनसीपी पथकाकडून मानवंदना, सर्वधर्मीय प्रार्थना, विज्ञान प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शन, सरस्वती पूत्र या भीतिपत्रकाचे अनावरण, आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात ७८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. पुण्याच्या ससून रक्तपेढीचे समाजसेवा अधीक्षक अरूण बर्डे, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. सुरेश सावंत, ममता राठोड सहभागी झाले. सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी केले.

Pimpri Chinchwad Edition
Jan 04, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com



पुणे, ४ जानेवारी २०२५
: @kesarinewspaper
२

# बुट्टेपाटील यांचे जीवन समाजासाठी समर्पित : ॲड. पानसरे



राजगुरुनगर, (वार्ताहर) : साहेबराव बुट्टेपाटील आमदार असताना त्यांनी शेतकऱ्यांसाठी चासकमान धरण आणि विद्यार्थ्यांसाठी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या रूपाने शाश्वत विकासाचा पाया भक्कम केला. त्यांचे संपूर्ण जीवन समाजासाठी समर्पित होते, अशी भावना ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सर्जेराव पानसरे यांनी व्यक्त केली.

साहेबराव बुट्टेपाटील यांच्या २४ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी आमदार बाबाजी काळे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, राष्ट्रवादीच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, डॉ. प्रकाश चौधरी, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

ॲड. पानसरे यांनी बोलताना साहेबराव बुट्टेपाटील यांच्या जीवन कर्तृत्वाला उजाळा दिला. त्यांचे व्यक्तिमत्त्व स्वच्छ, प्रामाणिक, चारित्र्यसंपन्न होते. त्यांना वक्तृत्वाची देणगी लाभलेली होती, त्यामुळे समाज त्यांच्याशी जोडला गेला होता असे ते म्हणाले. चासकमान धरणाच्या भूमिपूजनप्रसंगी धरणग्रस्तांची बाजू मांडताना त्यांनी खणाला खण आणि फणाला फण मिळाला पाहिजे अशी आग्रहाची भूमिका मांडली. त्यांनी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या रूपाने ज्ञानमंदिर उभे केले, त्याचा लाभ तालुक्यातील डोंगरी आदिवासी भागातील हजारो विद्यार्थ्यांना झाला. साहेबराव बुट्टेपाटील यांनी शेती आणि शिक्षणासाठी जे केले त्यातून ते कायम आपल्याबरोबर राहतील असा विश्वास ॲड. पानसरे यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी काजल वाळुंज, दिव्या पिंगळे या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले.

# विभिन्न कार्यक्रमों से मना साहेबराव बुट्टे का स्मृति दिवस



भास्कर न्यूज | राजगुरुनगर

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडल के संस्थापक अध्यक्ष तथा पूर्व विधायक साहेबराव बुट्टे पाटिल के 24वें स्मृतिदिवस के अवसर पर विभिन्न कार्यक्रम आयोजित किए गए। शुक्रवार को हुतात्मा राजगुरु महाविद्यालय में विज्ञान प्रदर्शनी आयोजित की गई। इस मौके पर विधायक बाबाजी काले, एड. सर्जेराव पानसरे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडल के अध्यक्ष एड. देवेंद्र बुट्टे पाटिल, उपाध्यक्ष नानासाहेब टाकलकर, संचालक बालासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, डॉ. प्रकाश चौधरी, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगले, डॉ. एच. एम. जरे आदि सहित विद्यार्थी उपस्थित थे। सर्जेराव पाटिल ने साहेबराव बुट्टे पाटिल के कार्यों की जानकारी दी। एनएसएस व एनसीसी की ओर से आयोजित शिविर में 78 लोगों ने रक्तदान किया। साहेबरावजी बुट्टे पाटिल कॉलेज व एनएसएस की ओर से जिला व अतिरिक्त सत्र न्यायालय परिसर में स्वच्छता अभियान चलाया गया।

दैनिक भास्कर
Sun, 05 Janu
https://epap

राष्ट्रसंचार

# साहेबराव बुट्टेपाटील स्मृतिदिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

▪ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, माजी आमदार स्व साहेबराव बुट्टे पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात शुक्रवारी (दि ३) विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन राष्ट्रवादी पक्षाच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील यांच्या हस्ते संपन्न झाले.

पुरोगामी महाराष्ट्र आणि आधुनिक भारत घडविण्यासाठी विज्ञानाधिष्ठित तरुणाई घडवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. विद्यार्थ्यांशी संपर्क साधून त्यांनी प्रयोगांमागील भूमिका जाणून घेतली. विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन समृद्ध होतो असे त्या म्हणाल्या.



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करताना ॲड. राजमाला बुट्टेपाटील .

या विज्ञान प्रदर्शनात ११६ प्रयोग मांडण्यात आले. या प्रदर्शनाचा २ हजार विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. स्मृतिदिन कार्यक्रमाच्या निमित्ताने क्रीडाज्योत, एनसीसी पथकाकडून मानवंदना, सर्वधर्मीय प्रार्थना, पुस्तक प्रदर्शन, सरस्वती पूजा या भीत्तिपत्रकाचे अनावरण, हस्ताक्षर स्पर्धा आदी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी आमदार बाबाजी काळे, ज्येष्ठ विधिज्ञ सर्जेराव पानसरे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, डॉ. प्रकाश चौधरी, प्राचार्य डॉ. एस.एस. पिंगळे, डॉ.एच. एम.जरे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. सर्जेराव पानसरे यांनी साहेबराव बुट्टे पाटील यांच्या जीवन कर्तृत्वाची माहिती दिली. काजल वाळुंज, दिव्या पिंगळे या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. प्रा. नंदकुमार गायकवाड यांनी विज्ञान प्रदर्शनाचे नियोजन केले. राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात ७८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. पुण्याच्या ससून रक्तपेढीचे समाजसेवा अधीक्षक अरूण बर्डे, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. सुरेश सावंत, ममता राठोड सहभागी झाले. सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख